## निशाणी क्र. २३ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांचेकडून अंतरीम अन्नवस्त्रापोटी दरमहा रक्कम रू. १५,०००/— (रूपये पंधरा हजार फक्त) मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सामनेवाला क्र. १ हा तिचा पती, सामनेवाले क्र. २ व ३ हे अनुक्रमे सासरे व सासु, सामनवोले क्र. ४ हे भाया, सामनेवाली क्र. ५ ही जावू व सामनेवाले क्र. ६ ही नणंद आहे. दिनांक २३.०२.२०२३ रोजी अर्जदाराचा सामनेवाले क्र. १ सोबत घोरवड, ता. सिन्नर येथे हिंदु धर्मपद्धतीने विवाह पार पडला. अर्जदार व सामनेवाले क्र. १ यांचा विवाह मोतीराम दशरथ हारक यांचे मध्यस्थीने ठरला होता. दिनांक ०१.०१. २०२३ रोजी त्यांचा सर्व नातेवाईकांसमक्ष साखरपुडा झाला. लग्न ठरविण्यापुर्वी अर्जदारास सामनेवाले क्र. १ हा पुणे येथे नोकरीस असुन त्यास दरमहा रूपये ३०,०००/— (रूपये तीस हजार फक्त) पगार आहे असे सांगण्यात आले. पगार स्लिप मागितली असता ती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली व त्यानंतरपासून त्याने अर्जदारास फोन करणे बंद केले. दिनांक १५.०१.२०२३ रोजी सामनेवालेंकडून लग्नात काय सामान व सोने घेणार याबाबत फोन केला. परंतु, माहीती न मिळाल्यामुळे त्यांनी लग्नाकरीता घाई करण्यास सुरूवात केली. त्यानंतर सदर विवाहाचा खर्च अर्जदाराचे आईवडीलांनी केलेला आहे. लग्नात संसारोपयोगी भांडी आणि फर्निचर अर्जदाराचे माहेरच्यांनी दिले आहे.

३. अर्जदाराचे असे कथन आहे की, लग्नानंतरची सत्यनारायण पुजा देखील सामनेवालेंनी नाखुशीनेच केली. दिनांक २६.०२.२०२३ रोजी सामनेवालेचे कुटुंबिय अर्जदारास पहीले मुळ घेवून आले. दुसरे दिवशी अर्जदार घरातील सर्व कामे आवरत असतांना सामनेवाले क्र. ३, ५ व ६ यांनी लग्नामध्ये दिलेल्या वस्तुंवरून अर्जदारास टोमणे मारण्यास सुरूवात केली. त्यानंतर लगेचच दिनांक २८.०२.२०२३ रोजी सामनेवाले क्र. १ पुणे येथे निघुन गेला. दुस—या मुळासाठी माहेरी जातांना सामनेवाली क्र.३ ने अर्जदारास

माहेरून मंगळसुत्रात २० सोन्याचे मणी घालून आणण्याबाबत सांगितले. दिनांक १०.०३.२०२३ रोजी अर्जदाराने ते न आणल्याबाबत सांगितले असता, सामनेवाली क्र. ३ ने अर्जदाराचे अंगावरील सर्व दागिने काढून घेतले. त्यानंतर सामनेवाला क्र. १ ने अर्जदारास फोन करणे बंद केले. दिनांक १९.०३.२०२३ रोजी सामनेवाले क्रमांक १ तिला पुण्याला घेवून जाण्यासाठी आला असता, प्रथम त्यास सामनेवाली क्र. ३ ने नकार दिला. परंतु, अर्जदाराचे नातेवाईकांनी मध्यस्थी केल्यानंतर तिने त्यास अनुमती दिली.

**४.** अर्जदाराचे असे कथन आहे की, पुणे येथे सामनेवाले क्र. १ तिचेशी सतत भांडण करत असे. त्यानंतर १५ दिवसांनंतर त्याने अर्जदारास त्याचे मुळगावी आणून सोडले. तेथे सामनेवाली क्र. ३ तिला गलिच्छ भाषेत टोमणे देत असे व लग्नात कमी पडलेल्या सामान/सोने बाबत बोलत असत. सामनेवालेने अर्जदारास बाहेरगावी फिरण्यास जाणेसाठी म्हंटले असता देखील सामनेवाली क्र. ३ काहीही बोलून सामनेवाला क्र. १ च्या मनात अर्जदाराविषयी चिड निर्माण करत असे व सामनेवाले क्र. १ ला अर्जदारास मारण्यासाठी प्रवृत्त करत असे.

**५.** पुढे अर्जदाराचे असे कथन आहे की, सामनेवाले क्र. ४ व ५ हे सुट्टीचे दिवशी गावी येवुन लग्नात सोने दिले नाही या कारणावरून शिवीगाळ करत असत. सामनेवाले क्र. ६ ही सामनेवाले क्र. १ ची विवाहीत बहीण असुन ती माहेरीच राहत आहे. मार्च २०२३ मध्ये सामनेवालेंनी त्यांच्या मागणीच्या पुर्ततेसाठी अर्जदारास लाथाबुक्यांनी मारहाण केली. दिनांक २१.०५.२०२३ रोजी सामनेवाले क्र. १ ने जेवणाच्या कारणावरून विनाकारण अर्जदारासोबत भांडण केले. तिला शारीरीक व मानसिक त्रास झाल्याने ती मोतीराम हारक यांचेसोबत माहेरी निघुन आली. २१ दिवस होवूनही कोणी घ्यायला न आल्याने फोन केला असता सुदाम हारक यांना सामनेवाले क्र. २ ने सांगितले की ''तुमची मुलगी दारू पिते''. दिनांक २७.०५.२०२३ रोजी अर्जदार नांदण्यास आली असता त्यांना ''बंगला विकून टाकू परंतु अर्जदाराला नांदविणार नाहीत, आमच्या मागणीची पुर्तता केली नाही आम्ही तिला नांदवणार नाही'' असे सांगितले.

**६.** अर्जदाराचे असे कथन आहे की, दिनांक ०७.०६.२०२३ रोजी सामनेवालेस आक्षेपार्ह असे १२ मॅसेज आले. अर्जदाराने तो फोन घेतला असता ''माझा फोन का घेतला?'' या कारणावरून त्याने तिला बेदम मारहाण केली. तेंव्हा शेजारील लोक जमा होवून त्यांनी तिची सामनेवालेचे तावडीतुन सुटका केली. दुस—या दिवशी पोलीसांत खोटी तक्रार देण्याची धमकी देवून सामनेवालेंनी तिला घराबाहेर हाकलून दिले. त्यामुळे नाईलाजाने तिला माहेरी जावे लागले. अर्जदार व कुटुंबियांचे फोन ब्लॅक लिस्टमध्ये टाकल्याने त्यांचा सामनेवाले क्र. १ शी संपर्क होवू शकला नाही. सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास दिनांक ०८.०७.२०२३ रोजीपासून हाकलून दिल्यापासुन अर्जदार तिच्या माहेरी राहत आहे. आजपावेतो सामनेवाले यांनी अर्जदाराची खुशाली विचारली नाही अगर तिला नांदणेस घेवून गेले नाहीत. अर्जदाराकडे पैशांची, सोन्याची मागणी करून मारहाण व क्रूरतेची वागणूक देवून अर्जदाराचा एकतर्फा त्याग केला आहे.

**७.** पुढे अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदारातर्फे तिच्या विधीज्ञांनी सामनेवाले यांना दिनांक २७.०७.२०२३ रोजी नोटीस तसेच दिनांक ०८.०९.२०२३ रोजी रिमाईंडर नोटीस पाठवून देखील सामनेवालेने अर्जदारास नांदण्यास नेले नाही अगर त्या नोटीसांचे उत्तर दिले नाही. त्यामुळे त्याची अर्जदारास नांदविणेची इच्छा नाही हे स्पष्ट होते.

**८.** अर्जदाराने सामनेवालेंविरूध्द अन्नवस्त्र, औषधोपचार व निवा—यासाठी कौटूंबिक हिंसाचारापासुन महीलांचे संरक्षण अधिनियम कलम १८, १९, २० व २२ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदरचे अर्जाचा अंतिम निकाल होईपावेतो बराच कालावधी लोटणार आहे. अर्जदारावर उपासमारीची वेळ आलेली आहे. सामनेवाला हा पुणे येथे नोकरीस असुन त्यास दरमहा रक्कम रूपये ३०,०००/— (रूपये तीस हजार फक्त) पगार मिळतो. त्याचप्रमाणे त्याची मौजे तळोशी, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे एकत्र कुटुंबाची शेतजमीन असुन ती बागायती व जिरायती असुन त्यापासुन त्याला वार्षिक निव्वळ रक्कम रू. १० लाखाचे उत्पन्न मिळते. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र. २ हे नोकरीतुन सेवानिवृत्त झालेले असुन त्यांना पेन्शन मिळते. सामनेवाला

क्र. ४ हे मुंबई येथे नोकरीस असुन त्यांना रू. ५० ते ६० हजार पगार मिळतो. अशा प्रकारे सामनेवाला क्र. १ वर अर्जदाराव्यतिरीक्त कोणाचीही जबाबदारी नाही.

**९.** पुढे अर्जदाराचे असे कथन आहे की, सामनेवालेंनी दिनांक ०८.०७.२०२३ पासुन अर्जदाराचा त्याग केलेला आहे. तिला कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदाराच्या मानसिक व शारीरीक छळामुळे ती दुर्बल झाली आहे. तिचेकडून काहीएक कामधंदा होत नाही. अर्जदार तिचे आईवडीलांकडे शिवडे, ता. सिन्नर येथे राहत असुन तिचे आईवडीलांची आर्थिक परिस्थिती बेताची असुन त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नावर तिला रहावे लागत आहे. अर्जदारास न्यायालयीन कामकाजासाठी तारखांना सोबत एक व्यक्ती घेवून यावे लागते. अर्जाचा खर्च व वकील फि व इतर खर्च असे मिळून तिला रू. २० हजार दयावे लागणार आहेत. सदरचा खर्च देण्याची तिची ऐपत नाही. त्यामुळे अन्नवस्त्र, औषधोपचार व पोटगीसाठी रक्कम रूपये १५ हजार व खर्चापोटी रक्कम रू. २२ हजार देण्यात यावेत, अशी अर्जदाराची मागणी आहे. अर्जाच्य पृष्टयर्थ निशाणी क्र. २४ अन्वये अर्जदाराने शपथपत्र सादर केले आहे.

**१०.** सामनेवालेंनी अर्जात हजर होवून निशाणी १८ ला मुळ अर्जास जबाब दाखल केला व निशाणी २५ ला पुरसीस देवुन नमुद केले की, निशाणी १८ ला दिलेला जबाब हा निशाणी २३ चे अंतरीम अन्नवस्त्राचे अर्जास जबाब म्हणून वाचण्यात यावा. त्यात त्यांचे कथन असे की, अर्जदाराचे विवाहासंबंधीचे कथनाव्यतिरीक्त इतर कथने ही खोटी व बेकायदेशीर आहेत. सामनेवाले हा बी.ई. मेकॅनिकल असुन त्यांचा विवाह हा उभयतांचे नातेवाईक व ओळखीने ठरलेला असुन लग्नापुर्वी दिनांक ०१.०१.२०२३ रोजी त्यांचा साखरपुडा नक्की होवून सुपारीचा कार्यक्रम साधेपणाने झालेला आहे. दिनांक २३.१०.२०२३ ही लग्नाची तारीख ठरली.

**११.** सामनेवालेतर्फे पुढे असे कथन आहे की, सदर लग्नात सामनेवालेतर्फे कोणतीही मागणी करण्यात आली नव्हती आणि लग्नाचा खर्च ज्यानेत्याने सोसावा असे ठरले होते. सामनेवालेचे आईवडीलांनी लग्नात अर्जदारास सोन्याची अंगठी, नेकलेस हार वगैरे दागिने दिले. सामनेवालेने अर्जदारास रेडमी कंपनीचा मोबाईल

फोन देखील घेवून दिला. अर्जदाराचे वडीलांनी काही वस्तु व भांडी घेवून दिले, कुठल्याही प्रकारचे दागिने दिलेले नाहीत. अर्जदार ही शिक्षीत आहे असे सांगण्यात आले. परंतु, तिचे शिक्षण लपविण्यात आले असे लग्न झाल्यानंतर समजले. सामनेवालेच्या परिस्थितीची पुर्ण माहीती घेतल्यानंतरच सदरचे लग्न ठरले. नांदण्यास आल्यानंतर सुरूवातीपासुनच अर्जदाराचा स्वभाव हा त—हेवाईक व भांडखोर होता. तरीही सामनेवाला तिचेशी जुळवुन घेवुन संसार करत होता.

१२. सामनेवालांचे पुढे कथन असे आहे की, पहिल्या मुळाला गेल्यानंतर पंधरा दिवस अर्जदार परत आलीच नाही. सामनेवालेची नोकरी अस्थायी स्वरूपाची असल्यामुळे त्याला लागलीच जावे लागले. त्यामुळे अर्जदारास भोसरी येथे नांदणेकामी नेले असता ती घरात या ना त्या कारणाने भांडणे करू लागली. सामनेवाला,वर सतत संशय घेवून ती त्याचेशी सतत भांडणे करत असे.

१३. सामनेवालांचे पुढे कथन असे आहे की, त्याचेशी संसार करण्यात तिला स्वारस्य नव्हते. त्यामुळे लग्नाची परिपुर्ती देखील झालेली नाही. सामनेवालेस ती टकला म्हणून हिनवत असे. पुण्याला रहात असतांना ४—५ दिवस झाले की, सामनेवालेला न सांगता ती माहेरी निघुन जात असे. तिची मनधरणी करून सामनेवाला तिला परत आणत असे, परंतु ती त्याचेशी जुळवुन घ्यायला तयार नसे. तळोशी आदिवासी भाग असल्याने अर्जदार त्यांना तुम्ही आदिवासी आहात असे हिनवत असे. ती फोनवर तासनतास बोलत असे. तिला दारूचे व्यसन होते. ती त्याचा फोन सतत तपासत असे व त्याचे प्रोफेशनल कम्युनिकेशन/टिचरचे फोनला देखील हरकत घेत असे व त्यांचेशी तिचे संबंध आहेत असा संशय घेत असे. ती सामनेवालेची पेमेंट स्लिप मागत असे. याउलट सामनेवाले व त्याचे कुटुंबियांनी तिला कधीही दुखावलेले नाही.

१४. सामनेवालांचे पुढे कथन असे आहे की, वरील परिस्थिती असतांना देखील अर्जदार सामनेवालेंचे घरात अबोला धरून रहात असे. सामनेवालेने तिला गावी न ठेवता सरळ पुणे येथे घेवून आला तरीदेखील तिचे स्वभावात बदल झाला नाही. अर्जदार हिला तिचे आईची फुस असुन ती सतत तिचे आई व इतरांशी फोनवर बोलत असे. दिनांक ०७.०७.२०२३ रोजी अर्जदाराने टयुशनच्या शिक्षीकेशी झालेल्या संभाषणावरून वाद घालून त्याला प्रचंड मानसिक त्रास दिला व दुस—या दिवशी सामनेवालेस काहीही न सांगता दिनांक ०८.०७.२०२३ रोजी माहेरी निघुन गेली आणि तेंव्हापासुन माहेरी राहत आहे. पुण्यात राहत असतांना ती सतत जिव

देण्याची भाषा करून सामनेवालेला ब्लॅकमेल करत असे. जवळपास ५ ते ६ वेळा चुकीच्या मागण्यांसाठी अर्जदार स्वत:हून माहेरी निघुन गेली आहे. सामनेवालेचे घरी येवून अर्जदाराने त्यांच्या घरातुन तिचे सर्व साहीत्य तसेच सामनेवालेने दिलेले सर्व दागदागिने, कपडेलत्ते, भांडेकुंडे नेलेले आहेत. यावरून तिची सामनेवालेकडे नांदण्याची इच्छा दिसत नाही. तिने स्वत:हून सामनेवालेचा त्याग केलेला आहे.

**१५.** सामनेवालेंचे पुढे असे कथन आहे की, सामनेवालेस रूपये ३०,०००/— (रूपये तीस हजार फक्त) पगार मिळत नसुन तो शेती देखील करत नाही. त्यास अल्प शेती असुन त्यात कोणतीही बागायती पिके होत नाहीत. सामनेवालेस खर्च जावून रू. १० लाख मिळतात हे अर्जदाराचे कथन खोटे आहे. त्याच्या वडीलांच्या पेन्शनशी त्याचा संबंध नाही. त्यास रूपये ५० ते ६० हजार पगार मिळतो हे खोटे आहे. अर्जदार ही नोकरी करत असुन तिला स्वत:चे उत्पन्न आहे. ती शिक्षीत असुन कॅपेबल आहे. फारकत मिळणेसाठी अर्जदाराने खोटे कथन केले असल्यामुळे ती केलेली मागणी मान्य होवून मिळणेस पात्र नाही. त्यामुळे तिचा सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**१६—अ.** दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. युक्तिवादादरम्यान अर्जदारातर्फे खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ देण्यात आला आहे :—

**[A] Lakhan @ Laxman Dadasaheb Kale V/s. Ankita Laxman Kale, 2023(1) ALL MR 16**

**HELD :**

*"Interim maintenance of Rs. 1,500/- was granted to wife. Husband claiming that wife is gainfully employed and he is not employed, therefore, wife is not entitled to interim maintenance. The wife is able to maintain herself, cannot be ground to deny interim maintenance to her. Even if wife is gainfully employed, it would always be responsibility of husband to maintain wife. There is no case that wife is earning and getting handsome salary. Husband is Software Engineer and possesses necessary qualification and ability to earn income for herself. Hence, order of trial Court to grant interim maintenance of Rs. 1,500/- was held proper"*

**[B] Vaibhav Harshad Shah V/s. Pooja Vaibhav Shah, 2021(4) ALL MR 554,**

**HELD :**

*"In this matter, interim maintenance of Rs. 40,000/- per month was granted to the wife. Husband claimed that the said amount of maintenance is beyond his known source of income. Husband is into steel business. Parties are living luxurious life after marriage. After break-up, wife started residing with her parents and she has no independent source of income*

*and is dependent on her parents to meet her day-to-day requirements. Grant of maintenance of Rs. 40,000/- pendent lite, was held proper".*

**[C] Vandana Rajesh Mate V/s. Rajesh s/o. Shvirnivas Mate, 2021(5) ALL MR 629**
**HELD :**

*"In the matter filed U/Sec. 125 of the Cr.P.C. wife claimed that husband earns Rs. 75,000/- per month. Husband denied it and claimed that he was as Supervisor with a building material supplier. The said fact is within the special knowledge of the husband. Hence, he has to bring the evidence of his income. Upon his failure, adverse inference would be drawn. The maintenance U/Sec. 125 of the Cr.P.C. is to be granted from the date of application".*

**१६–ब.** युक्तिवादादरम्यान सामनेवालेंतर्फे खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ देण्यात आला आहे :–

**[1] Rajnesh V/s. Neha and Anr., AIR 2021 Supreme Court 569,**
**HELD :**

*"It is well settled that a wife can make a claim for maintenance under different statutes. There is no bar to seek maintenance both under the D.V. Act and Section 125 of the Cr.P.C. or under H.M.A. It would however be inequitable to direct the husband to pay maintenance under each of the proceedings, independent of the relief granted in a previous proceeding. If maintenance is awarded to the wife in a previously instituted proceeding, she is under a legal obligation to disclose the same in a subsequent proceeding, which may be filed under another enactment. While deciding the quantum of maintenance in subsequent proceeding the Court shall take into account the maintenance awarded in any previously instituted proceeding, and determine the maintenance payable to the claimant.*

**[2] Criminal Revision Application No. 233 of 2018 in the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad decided on March 16, 2023**
**HELD :**

*"The law is well settled that a person having remedies under the various Acts may exercise it independently. The Domestic Violence Act is a law in addition to and not in derogation of the provision of any other law for the time being in force. The wife may simultaneously claim the relief under D.V. Act and under section 125 of the Cr.P.C. The test to prove the domestic violence and refusal and neglect to maintain are different. The concept of domestic violence could not be compared with the concept of Sec. 125 of the Cr.P.C".*

**[3] Gaurav Vashistha V/s. State of U.P. and Another, Neutral Citation No. 2023:AHC:123312**

**HELD :**

*"The provisions of Sec. 125(4) of the Cr.P.C. is very clear that no wife shall be entitled to receive any maintenance from her husband if she refused to live with her husband".*

**[4] Anil S/o. Shri Suganchandra Jain V/s/ Smt. Sunita W/o. Shri. Anil Kumar Jain and State of M.P. on 29 November, 2016**
**HELD :**

*"In this case it was held that the wife was shown with force from her matrimonial home or she was forced to leave her matrimonial home. She was residing separately without any reason and hence, she was not entitled for maintenance under section 125 of the Cr.P.C".*

१७. दोन्ही बाजुंकडून दाखल न्यायनिर्णयांचे अवलोकन केले. अभिलेख पाहीले.

१८. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मुददे् माझया विवेचनाकरीता उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवीत आहे :—

| **अ.क्र.** | **मुददे्** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदारास सकृतदर्शनी केस आहे काय ? | ....अंशतः होय. |
| २ | अर्जदाराने सकृतदर्शनी सिध्द् केले आहे काय की, सामनेवाला क्र. ०१ ने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकडे पुर्णपणे दुर्लक्षित केले आहे अथवा तिला सांभाळण्यास त्याने पुर्णपणे नकार दिला आहे? | ....अंशतः होय. |
| ३ | अर्जदाराने सकृतदर्शनी सिध्द् केले आहे काय की, तिची उपजिवीका करण्याची असमर्थता असून सामनेवाला क्र. ०१ याची तिचा उदरनिर्वाह करण्याची पुरेपूर क्षमता आहे? | ....अंशतः होय. |
| ४ | अर्जदार ही सामनेवाला यांचेकडून अंतरिम पोटगीचा आदेश मिळणेस पात्र आहेत काय? असल्यास कोणत्या दराने व केव्हापासून? | ....अंशतः होय, केवळ सामनेवाला क्र. १ कडून, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ५ | आदेश काय ? | .....अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

<u>**कारणमिमांसा**</u>

<u>**मुददे् क्र. ०१ ते ०४ करीता**</u> :—

१९. सदर मुददे् एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितपणे

करण्यात येत आहे. अर्जदाराने निशाणी क्र. ०३ सोबत सामनेवालेला पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, सदर नोटीस पाठविल्याचे पोस्टाची पावती, सदर नोटीस मिळाल्याची पोस्टाची पोचपावती, सदर नोटीसचा संगणकीकृत ट्रॅक रिपोर्ट, सामनेवाला यास पुन्हा पाठविलेली नोटीस, सामनेवाला यास पुण्याच्या पत्त्यावर पाठविलेल्या नोटीसची बंद पाकीट, सामनेवाला यास तळोशी, इगतपुरीच्या पत्यावर पाठविलेल्या नोटीसच्या पोचपावती, अर्जदाराचे आधारकार्ड व लग्नपत्रिकेची छायांकित प्रत, तळोशी येथील गट क्र. ६०५, ४०५, ४४१, ४४२, ४४३, ५९६ च्या सातबारा उता—यांची प्रत, अर्जदाराच्या शिधापत्रिकेची छायांकित प्रत, अर्जदाराने सामनेवालेस लग्नात दिलेल्या सामनाचे मुळ बिल व अर्जदाराने महीला सुरक्षा विभाग यांचेकडे तक्रार दाखल केल्याने निघालेल्या नोटीसची मुळप्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**२०.** सामनेवाला यांचेतर्फे अर्जदाराचे वडीलांचे नावे असलेल्या वडीलोपार्जित शेतजमीनींचे खाते उतारे व सातबारा उतारे, सामनेवाले यांनी दिलेल्या माहीतीच्या अधिकाराचा अर्ज व त्यावरील सर्व कागदपत्र, समजपत्र, भरोसा सेल, नाशिक ग्रामिण यांचेकडील जावक क्र. ६०५/२०२४, भोसरी पोलीस ठाणे येथील अदखलपात्र गुन्हयाची प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. अर्जदार हीने निशाणी क्र. ११ वर अन्वये व सामनेवाला क्र. १ याने निशाणी क्र. २० अन्वये मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र सादर केले आहे.

**२१.** दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व अभिलेखावर आलेली कागदपत्रे पाहिली असता, अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह झाल्याची, सदर विवाह संबंध कायम असल्याची बाब तसेच सदर विवाह संबंधांतुन कोणतेही अपत्ये नसल्याची बाब वादातीत नाही. प्रस्तुत अर्जदार हीने सामनेवाला यांचेविरूद्ध त्यांनी लग्नामध्ये त्यांच्या मर्जीप्रमाणे सामान व सोने दिले नाही, या कारणावरून तिचा शारीरीक व मानसिक छळ केल्याचे व माहेरी हाकलून दिल्याचे कथन मांडले आहे.

**२२.** याउलट सामनेवाला यांनी अर्जदार हीने स्वत:हून सामनेवाला क्र. १ चा त्याग केला असल्याचे कथन मांडले आहे. अर्जदार ही कोणत्या कारणावरून माहेरी राहत आहे, ही बाब उभय पक्षकारांकडून सादर होणा—या मौखिक व लेखी पुराव्यावरून गुणवत्तेवर तपासून पहावी लागणार आहे. तथापि, अर्जदार ही सामनेवाला क्र. १ ची कायदेशिर पत्नी असल्याचे दिसून आल्याने एक ‘पती’ म्हणून त्याने तिला सांभाळण्याची त्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे.

**२३.** अर्जदार हीने सामनेवाला क्र. १ यास नोकरीमधुन दरमहा रक्कम रूपये ३० हजार इतका पगार असुन त्यास मौजे तळोशी, ता. इगतपुरी, जिल्हा नाशिक येथे एकत्र कुटुंबाची शेतजमीनीमधुन वार्षिक निव्वळ रक्कम रू. १० लाखाचे उत्पन्न मिळत असल्याचे व त्याचेवर अर्जदार सोडून इतर कोणीही अवलंबुन नसल्याचे कथन केले आहे. याउलट सामनेवाला यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरचे कथन नाकारले आहे. अर्जदाराने निशाणी क्र. ११ वरील मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रामध्ये उत्पनाचे साधन निरंक असे नमुद केले आहे. सामनेवाला क्र. १ याने त्याचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रामध्ये सामनेवाला यास भोसरी, पुणे येथील अस्थायी नोकरीमधुन दरमहा रक्कम रू. २२ हजारचे जवळपास पगार मिळत असल्याचे व इतर अन्य उत्पन्नाचे स्त्रोत नसल्याचे नमुद करण्यात आले आहे.

**२४.** अर्जदारातर्फे मौजे तळोशी येथील शेतजमीनींचे दाखल सातबारा उतारे पाहीले असता त्यामध्ये सामनेवाला क्र. १ याचे स्वतंत्रपणे नाव नमुद असल्याचे दिसत नाही. सदरची जमीन त्याच्या एकत्र कुटुंबाची असल्याचे अर्जदाराने कथन मांडले असुन सामनेवाला यांनी ते नाकारले आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला यांचेतर्फे अर्जदाराच्या वडीलांच्या नावे असलेल्या जमिनींचे सातबारा उतारे दाखल केले आहेत. युक्तिवादादरम्यान सामनेवालेंतर्फे विधीज्ञ यांनी असे म्हणणे सादर केले की, सदरच्या जमीनी अर्जदाराच्या वडीलोपार्जित असुन त्यात तिचाही हक्क असल्याने येणा—या उत्पन्नात तिचाही हक्क आहे. अर्जदार ही नोकरी करत असुन तिला स्वत:चे उत्पन्न असल्याचे सामनेवालाने कथन मांडले आहे. परंतु, अर्जदार ही स्वत:चा चरितार्थ सांभाळण्यास सक्षम नसल्याचे तिचे कथन आहे.

**२५.** दोन्ही बाजुंचे विरूद्ध अभिकथन व अभिलेखावर आलेला पुरावा पाहता, अर्जदाराच्या वडीलांच्या नावे असलेल्या सातबारा उता—यावरून सदरच्या जमिनी वडीलोपार्जित असल्याचा सद्यस्थितीत निष्कर्ष काढता येत नाही. तसेच, आजमितीस अर्जदार ही स्वत:चा चरितार्थ सांभाळण्यास समर्थ असल्याबाबत सकृतदर्शनी अभिलेखावर पुरावा आलेला नाही. त्यामुळे ती त्यास असमर्थ आहे, असेच सध्या सकृतदर्शनी अनुमान काढावे लागेल. सामनेवाले क्र. १ याने त्याच्या निशाणी क्र. २० वरील शपथपत्रामध्ये त्यास रक्कम रू. २२ हजार दरमहा पगार असलेबाबत नमुद केले आहे.

**२६.** अर्जदार ही तिच्या माहेरी रहात असल्यापासून सामनेवाला क्र. १ याने तिच्या उपजिवीकेसाठी काय सोय केली, हे त्याच्या म्हणण्यात स्पष्ट केले नाही.

अर्जदाराने उदरनिर्वाहासाठी अर्ज दाखल करेपर्यंत सामनेवाला क्र. १ याने तिला कोणत्या सुविधा पुरविल्या, हे अभिलेखावर सकृतदर्शनी आले नसल्याने एक 'पती' म्हणून त्याने कायदेशिर व नैतिक दायित्व निभावले नाही, असेच सकृतदर्शनी दिसून येते. शिवाय, अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन असलेबाबत सकृतदर्शनी पुरावा सामनेवाला यांनी सादर केला नाही. त्यामुळे दैनंदिन आयुष्य जगण्यासाठी अर्जदारास अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल.

२७. अर्जदाराने प्रस्तुत अर्जात सामनेवाले यांचेकडून अंतरीम पोटगी मिळणेसाठी विनंती केली आहे. अर्जामध्ये सामनेवाला क्र. २ यांना निवृत्ती वेतन मिळत असल्याचे, सामनेवाला क्र. ४ यांना नोकरीतुन रक्कम रू. ५० ते ६० हजार मिळकत असल्याचे नमुद करण्यात आले आहे. तथापि, प्रस्तुत अर्जाची अंतिम निर्गती गुणवत्तेवर करताना सामनेवाला क्र. १ वगळता इतर सामनेवाला यांचे कथित उत्पन्नाचा मुळीच विचार करता येणार नाही. सदर अर्जदाराच्या कथनांवरून सामनेवाला क्र. २ व ४ हे सामनेवाला क्र. १ वर अवलंबुन नाहीत, असा निष्कर्ष त्यातुन सकृतदर्शनी काढता येतो.

२८. सामनेवाला यांचेतर्फे वर नमुद दिलेल्या न्यायनिर्णयांच्या संदर्भानुसार एखादया पत्नीने घरगुती हिंसाचार प्रतिबंधक अधिनियमा अंतर्गत व फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम १२५ अंतर्गत पोटगी मिळण्यासाठी अर्ज केला असल्यास सुरूवातीच्या प्रकरणात मंजुर केलेल्या पोटगीच्या रक्कमेचा विचार दुस—या प्रकरणातील पोटगीचा अर्ज मंजुर करतांना न्यायालयाने करावा, असे निरीक्षण नोंदविले आहे. परंतु, प्रस्तुतचे प्रकरण व फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १२५ अन्वये प्रस्तुत अर्जदाराने केवळ सामनेवाला क्र. १ याचेविरूद्ध दाखल केलेला अर्ज — फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४४५/२०२३, या दोन्ही प्रकरणांमधील प्रस्तुत अर्जदारातर्फे अंतरीम पोटगी मिळण्याचे अर्ज हे सुनावणीसाठी एकत्रित घेतले असुन आजरोजी आदेशाासाठी घेण्यात आले आहेत.

२९. अर्जदाराच्या मुलभूत गरजा, सदयस्थितीतील महागाई, अर्जदाराचे आरोग्य, सामनेवाला याचे उत्पन्नाचे साधनाबाबतचे अनुमान, त्याचेवर अवलंबून असणा—या कुटूंबियांची संख्या आणि उभय पक्षांचा असलेला राहणीमानाचा दर्जा इत्यादी बाबी प्रथमदर्शनी पाहिल्या असता, अर्जदारास मुळ अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून दरमहा प्रत्येकी रक्कम रू. ३,०००/ — (रूपये

तीन हजार फक्त) या दराने सामनेवाला कडून मिळणेचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब, मुदद्‌ा क्र. ०१ ते ०४ चे निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदविले आहे.

**<u>मुदद्‌ा क्र. ०५ करीता</u>** :—

**३०.** उपरोक्त मुददे क्र. ०१ ते ०४ करता केलेल्या विवेचनाच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज हा अंशत: मंजूर होणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :—

**—: <u>आदेश</u> :—**

१ अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२ सामनेवाला क्र. १ याने अर्ज दाखल तारखेपासून अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अर्जदार हीला दरमहा रक्कम रू. ३,०००/— (रूपये तीन हजार फक्त) या दराने अंतरिम पोटगी दयावी.

३ प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यास विनामूल्य देण्यात यावी.

सही/—

( **आर. आर. कुलकर्णी** )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
सिन्नर न्यायालय, सिन्नर

ठिकाण :— सिन्नर.
दिनांक :—१७/१२/२०२४.